सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महत्वाचे

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२४/3222
दिनांक :- 25/10/2024

प्रति,

प्राचार्य,
बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम/एमबीए इंटिग्रेटेड/एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बीसीए/ बीबीए/ बीएमएस/ बीबीएम/ एमबीए इंटिग्रेटेड/ एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ:-** १) मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोदयोग, संसदीय कार्य यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक व्हि.आय.पी./मुं/८५४/२०२४ दिनांक १४/१०/२०२४.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/संस्थास्तरीय प्रवेश/२०२४/८८८ दिनांक २३/१०/२०२४.

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम/एमबीए इंटिग्रेटेड / एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक अभ्यासक्रमांची संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया राबवित असतांना शासनाने निर्धारीत केलेल्या नियमांचे तंतोतंत पालन होते किंवा कसे? याबाबत तपासणी करण्याचे निर्देश संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास दिलेले आहेत.

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ च्या पोट नियम १३ तसेच सुधारीत नियमांमध्ये नमुद केल्यानुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश विनाअनुदानित संस्थेतील संचालक किंवा प्राचार्य यांनी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठीची पध्दती निश्चित केलेली आहे. त्यानुसार संस्थांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियम १३ मधील तरतूदीनुसारच संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया करावी अशा आशयाचे परिपत्रक संचालयाने निर्गमीत केलेले आहे.

या विभागातील बीसीए/बीबीए/बीएमएस/बीबीएम/एमबीए इंटिग्रेटेड / एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना १३ मधील तरतूदीप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी करुन संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत नियमांचे काटेकोरपणे पालनक करावे. तसेच आपल्या संस्थेने नियमबाहय पध्दतीने प्रवेश झाल्याचे सिध्द झाल्यास असे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या स्तरावर रद्द होतील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

याबाबत आपल्या संस्थांची तपासणी करण्याकरीता या कार्यालयाकडून निरीक्षकांची नेमणूक करण्यात येईल. या कार्यालयामार्फत नेमण्यात आलेले निरीक्षक लवकरच आपल्या संस्थेला भेट देऊन वरील बाबीची तपासणी करण्यात येईल व सदर निरीक्षकांना आपल्याकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात यावे.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

**( मनोज म. अंधारे )**
**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय. अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https : dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/संस्थास्तरीय प्रवेश/२०२४/ ८८८ दिनांक : 23 OCT 2024

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर

विषय: बीसीए/ बीबीए/ बीएमएस/ बीबीएम/ एमबीए इंटिग्रेटेड/ एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक **अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेबाबत...**

संदर्भ: मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोदयोग, संसदीय कार्य यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक व्ही.आय.पी./मुं./८५४/२०२४, दि.१४.१०.२०२४

मा.मंत्री महोदय यांनी संदर्भीन पत्रान्वये बीसीए/ बीबीए/ बीएमएस/ बीबीएम/ एमबीए इंटिग्रेटेड/ एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक अभ्यासक्रमांची संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया राबवित असतांना शासनाने निर्धारीत केलेल्या नियमांचे तंतोतंत पालन होते किंवा कसे? याबाबत तपासणी करण्याचे निर्देश देलेले आहेत.

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ च्या पोट नियम १३ तसेच सुधारीत नियमांमध्ये नमूद केल्यानुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश विनाअनुदानीत संस्थेतील संचालक किंवा प्राचार्य यांनी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठीची पध्दती निश्चित केलेली आहे. त्यानुसार संस्थांनी महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियम १३ मधील तरतूदीनुसारच संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया करावी अशा आशयाचे परिपत्रक संचालनालयाने निर्गमित केलेले आहे.

आपल्या विभागांतर्गत असलेल्या बीसीए/ बीबीए/ बीएमएस/ बीबीएम/ एमबीए इंटिग्रेटेड/ एमसीए इंटिग्रेटेड या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना नियम १३ मधील तरतूदीप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी करून संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. तसेच आपल्या विभागातील महाविद्यालयांमध्ये नियमबाहय पध्दतीने प्रवेश झाल्याचे सिध्द झाल्यास असे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या स्तरावर रद्द होतील याची स्पष्ट जाणीव संबंधितांना करुन देण्यात यावी.

याबाबत आवश्यकतेनुसार सदरील संस्थांची तपासणी करण्याकरीता आपल्या स्तरावरून निरीक्षकांची नेमणूक करण्यात यावी. निरीक्षकांनी नोंदविलेल्या निरीक्षणांची नोंद ठेवण्यात यावी. आपल्या विभागात सदरील अभ्यासक्रमात संस्था स्तरावर करण्यात आलेला प्रवेशासंबंधिचा अहवाल संचालनालयास दि.१०.११.२०२४ रोजी पर्यंत सादर करावा.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १)मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता सादर
२)मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना माहितीकरीता

D:\DTENS1_Backup 18 Dec २०२३\२०२४\General Correspondence\Agains CAP Admission Circular & Nivedan\Institute level Quota admission Letter to RO Pune ०२.९.२०२४.docx